PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 7, ISSUE 2

# स्थानिक शासन आणि महात्मा गांधी तंटामुक्त मोहीम

**डॉ. सुरेश लक्ष्मण शहापुरे**
**राज्यशास्त्र विभाग प्रमुख**
**शिव छत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय,**
**वडगाव बु.पुणे 41. महाराष्ट्र भारत**

**गोषवारा:**
प्रस्तुत शोध निबंधांमध्ये महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेवर स्थानिक शासनाच्या उद्देशाचा प्रभाव पडलेला आहे याचा अभ्यास केला आहे. महाराष्ट्र राज्यात २००७ पासून या मोहिमेची अंमलबजावणी कशा प्रकारे झाली आहे याचा वेध घेतला आहे. प्रस्तुत शोध निबंधासाठी स्थानिक शासन पातळीवरील तंटा मुक्त गाव मोहिमेचा अभ्यास करणे आणि महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीमेवर नियंत्रण स्वरूपात राज्यशासनाच्या प्रभावाचा अभ्यास करणे हे उधिष्ट ठेवण्यात आले होते. सामाजिक न्याय या राज्यशास्त्रातील संकल्पनेचा आधार घेऊन स्थानिक शासन पातळीवर तंटा मुक्त गाव मोहीम स्पष्ट करून शोध निबंध पूर्ण केला आहे.

**कळीचे शब्द:** लोकशाही शासन, सामाजिक न्याय, राजकीय उत्तरदायीत्व, सार्वजनिक धोरण, राजकीय नेतृत्व

## प्रस्तावना

स्थानिक शासन म्हणजे पूर्ण राज्या ऐवजी अंतर्गतदृष्ट्या छोट्या भूभागात व्यवस्थापन करून, निर्णय घेऊन त्याची कार्यवाही करणारी सत्ता होय. स्थानिक शासन कारभारा अंतर्गत सेवांचे व्यवस्थापन करण्यासाठी, गावातील वाद, तंटे गावातच लोक सहभागातून सोडविण्यासाठी स्थानिक शासन व महाराष्ट्र शासनाची लोकप्रिय महात्मा गांधी तंटामुक्त मोहीम महत्त्वाची

आहे. तंटामुक्त गाव मोहिम म्हणजे स्थानिक लोकांनी त्यांच्याशी संबंधित असलेल्या उदा. शेती, घर, पाणी, रस्ता विषयांचे स्वत:च न्याय निवाडाचे व्यवस्थापन करणे होय. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचा ग्रामीण जीवनांवर फार मोठा परिणाम होताना दिसून आलेला आहे. ग्रामीण जनतेचे जीवन सुखी व समृध्द बनविण्यासाठी तंटामुक्त मोहिमेचा प्रयोग महत्त्वपूर्ण आहे. ग्रामीण क्षेत्रातील सामान्य जनतेच्या विकासासाठी आप-आपसातील तंटे सामोपचाराने सोडविण्यासाठी एक नाविन्यपूर्ण यंत्रणा माजी उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांच्या नेतृत्वात उभारली होती. स्थानिक शासनाला सहाय्य करण्यासाठी महात्मा गांधी तंटामुक्त मोहिमेची खालील घटक स्पष्ट करता येतात.

**संशोधनाची उद्दीष्ठे**

१ स्थानिक शासन पातळीवरील तंटा मुक्त गाव मोहिमेचा मोहिमेचा अभ्यास करणे.

२ महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीमेवर नियंत्रण स्वरूपात राज्यशासनाच्या प्रभावाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके**

१ महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेवर स्थानिक शासनाच्या उद्देशाचा प्रभाव पडलेला आहे.

२ स्थानिक शासन पातळीवर महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम सुव्यवस्थित चालवण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे.

**सैद्धांतिक संकल्पना व संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोध निबंधासाठी सामाजिक न्याय या राज्यशास्त्रातील संकल्पनेचा आधार घेण्यात आला आहे. विसाव्य शतकाच्या उत्तराधार्त सामाजिक न्यायाची संकल्पना जॉन रॉल्स नावाच्या राजकीय तत्त्ववेत्त्याशी जोडण्यात आले होते. त्यांनी १९७१ मध्ये **The Theory of Justice** हे पुस्तक लिहून सामाजिक न्यायाची चर्चा घडवून आणली होती. प्रस्तुत शोध निबंधासाठी सामाजिक शास्त्रातील वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा आधार घेण्यात आला आहे.

**तथ्य संकलनाची साधने**

प्रस्तुत शोध निबंधासाठी द्वित्तीय साधनाचा वापर केला आहे. द्वितीय सामग्री मध्ये विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक व अहवाल, विविध संकेतस्थळे, मासिके, वर्तमानपत्रे, त्रैमासिके महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेची वास्तविक कार्यपद्धतीतील तंत्रे, माध्यमे इत्यादी द्वारे संशोधन विषयाच्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती संकलित केली आहे.

**नमुना निवड व मर्यादा**

प्रस्तुत शोध निबंधांसाठी महाराष्ट्र शासनाची महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेची निवड केली होती. सामाजिक संशोधन नमुना निवड पद्धतीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीच्या आधारे मोहिमेची निवड केली आहे. तंटामुक्त गाव मोहिमेचा अभ्यास महाराष्ट्र राज्या पुरताच मर्यादित आहे.

**तथ्य संकलन आणि विश्लेषण**

धोरण ठरविण्याच्या अधिकाराचा आधारावर स्थानिक शासनाला आपले धोरण किंवा नीती ठरविण्याचा अधिकार नाही. जिल्हा प्रशासन व जिल्हाधिकारी हे राज्यशासनाचे सदस्य व प्रतिनिधी म्हणूनच कार्यरत असतात. जिल्हाधिकाऱ्याला जिल्ह्याचे धोरण निर्धारित करता येत नाही तर ते राज्यशासनानेच निर्धारित केलेले असते, याउलट स्थानिक स्वशासन हे आपले धोरण निर्धारित करते व त्या धोरणानुसार आपला कार्यक्रम चालविते. एखादी जिल्हा परिषद आपल्या जिल्ह्याच्या जनतेची आवश्यकता लक्षात घेऊन तिची पूर्तता करण्याचे धोरण निश्चित करु शकते व तिला मूर्त स्वरूप देऊ शकते. म्हणून राज्य शासनाच्या धोरणाचा प्रभाव स्थानिक पातळीवरील महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीमेवर सुद्धा पडलेला आहे.

**नियंत्रणाच्या स्वरूपाच्या आधारावर** महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीमेवर नियंत्रण स्वरूपात राज्यशासनाचा प्रभाव दिसून येतो. स्थानिक शासनावर राज्य शासनाचे संपूर्ण व प्रत्यक्ष नियंत्रण असते. परंतु स्थानिक स्वशासन संस्थावर राज्य शासनाचे संपूर्ण व प्रत्यक्ष नियंत्रण

नसते. स्थानिक स्वशासन संस्थांवर राज्य शासनाला नियंत्रण करण्याचा अधिकार राज्याच्या कायदे मंडळाने निर्धारित करावा लागतो.

**उद्देशाच्या आधारावर** कोणतीही मोहीम, योजना, नियोजन हे उद्देशाच्या आधारावर केले जाते. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेवर सुद्धा स्थानिक शासनाच्या उद्देशाच्या आधाराचा प्रभाव पडलेला आहे. स्थानिक शासनाचा मुख्य उद्देश केंद्र किंवा राज्य शासनाच्या निर्देशानुसार स्थानिक शासनाचे प्रशासन सुव्यवस्थित चालविणे होय. परंतु स्थानिक स्वशासनाच्या उद्देश आपल्यासाठी धोरण निश्चित करून, त्या धोरणांची योजनाबद्ध अंमलबजावणी करणे होय.

**स्थानिक शासन चालविण्याच्या जबाबदारीवर** महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम स्थानिक शासन पातळीवर सुव्यवस्थित चालवण्याची जबाबदारी राज्य शासनाची असते. त्याचप्रमाणे स्थानिक शासन हे आपल्या चांगल्या-वाईट कामासाठी राज्य किंवा केंद्र शासनाला उत्तरदायी असते. याउलट स्थानिक स्वशासन व्यवस्थित चालवण्याची संपूर्ण जबाबदारी त्यांच्या स्वतःची असते. त्यासाठी ते स्वतः नियम तयार करतात. त्यांच्या चांगल्या वाईट कामासाठी ते स्थानिक लोकांना उत्तरदायी असतात. म्हणून महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम सुद्धा स्थानिक शासनाला जबाबदार असते.

**कार्यक्षेत्रात बदल घडून आणणे** स्थानिक शासनात राज्य शासनाची भूमिका महत्त्वाची असते. राज्य सरकार आपल्या अधिकार कक्षेत स्थानिक शासनाच्या कार्यक्षेत्रात बदल करू शकते. राज्यशासनाची ही कार्यकारी सत्ता स्थानिक स्वशासनाच्या बाबतीत व कार्यक्षेत्रात बदल करण्याच्या संदर्भात काही करू शकत नाही. स्थानिक स्वशासनाच्या कार्यक्षेत्रातील बदल करण्यासाठी राज्याच्या कायदेमंडळानेच ठरविले पाहिजे. राज्यशासन आपल्या अखत्यारीतीतील एखाद्या खात्याची किंवा विभागाची फेररचना करू शकते. त्या विभागाचा किंवा खात्याचा छोटा-मोठा घटक इतर खात्यांना जोडला जाऊ शकतो किंवा यांच्या उलट हे करता येते. म्हणून महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेची रचना, कार्यपद्धतीत बदल घडविण्याचा अधिकार राज्याच्या कायदेमंडळानुसार बदल घडविला जातो. स्थानिक प्रशासनाचे कर्मचारी वर्ग हा शासकीय नोकर अर्थात लोकसेवक या प्रकारात मोडतात. तर महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम ही लोकचळवळीवर आधारीत आहे. त्यांची निवड राज्यशासनाच्या मार्गदर्शन

नियमावलीवर आधारित केली जाते. स्थानिक शासन संस्थांचा कर्मचारी वर्ग हा अर्धशासकीय नोकरवर्ग म्हणून ओळखला जातो. राज्य शासनाकडून या संस्थेचे केवळ कार्यकारी प्रमुख व तत्सम अधिकारी वर्ग नेमला जातो. या संस्थांचा जास्तीत जास्त नोकरवर्ग स्थानिक स्वशासन संस्थेकडूनच नेमला जातो. लेखापाल, सफाई कामगार, ग्रामसेवक, तलाठी इत्यादी सेवकांची भरती स्थानिक स्वशासनाकडून केली जाते, हा नोकरवर्ग लोकसेवकाच्या वर्गात मोडत नाही. स्थानिक स्वशासन ज्याप्रमाणे नोकर भरती स्थानिक पातळीवरच केली असल्याचे दिसते. तसे स्थानिक शासनात स्थानिक पातळीवर भरती केलेली दिसत नाही.

**नोकरशाहीचा कार्यभाग** स्थानिक शासनाच्या कार्यभागात नोकरशाहीचा महत्त्वाचा आधार आहे. नोकरशाहीचा प्रभाव स्थानिक शासनात जसा प्रकार्षाने आढळतो. तसा नोकरशाहीचा प्रभाव स्थानिक स्वशासनात आढळून येत नाही. स्थानिक स्वशासन हे अधिक लवचिक असते. त्याच्या तुलनेत स्थानिक शासन अधिक परिदृढ असते. दप्तर दिरंगाई इतर औपचारिक प्रशासकीय बार्बीमुळे निर्माण होणारे प्रश्न हे नोकरशाहीचे दोष समजले जातात. हे दोष स्थानिक स्वशासनात आता आढळत नाहीत.

**लोकप्रतिनिधींची भूमिका** महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमे अंतर्गत लोकप्रतिनिधींची भूमिका महत्त्वाची आहे. लोकप्रतिनिधींची गरज महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीमेला आहे. स्थानिक शासनामध्ये लोकप्रतिनिधी आपली भूमिका महत्त्वाची दर्शवितात. जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींचा प्रत्यक्ष प्रभाव स्थानिक शासनात नसतो. स्थानिक शासनाच्या स्थानिक सल्लागार समिती अथवा घटक याद्वारेच ते प्रतिनिधी स्थानिक प्रशासनांवर प्रभाव टाकू शकतात. स्थानिक स्वशासनाच्या बाबतीत जनप्रतिनिधींचा मात्र प्रत्यक्ष प्रभाव असतो. स्थानिक स्वशासनातील जनप्रतिनिधी प्रत्यक्षात प्रभाव पाडतात व बऱ्याच वेळा स्थानिक स्वशासनाच्या अनेक कार्यात अप्रत्यक्षरित्या सहभागी झालेले आढळतात.

**जनतेची जागरुकता** समाज हा लोकशाहीचा आरसा आहे. कोणतेही धोरण यशस्वी होण्यासाठी जनतेची जागरुकता महत्त्वाची आहे. म्हणून महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेची यशस्विता ही जनतेच्या जागरुकतावरच आधारित आहे. स्थानिक शासन जनतेच्या आवश्यकते प्रती जागरूक असत नाही, हे आपण नेहमी अनुभवतो. राज्य किंवा केंद्र शासन स्थानिक

लोकांच्या गरजांकडे लक्ष पुरवीत नाही. त्यांच्या गरजांचा विचार करावा असेही अनेक वेळा त्यांना वाटत नाही. त्या गरजांची पूर्तता करण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नसतो. असा एकूण उदासीनतेचा दृष्टिकोन आढळतो. त्यामुळेच स्थानिक स्वशासन संस्थेची निर्मिती झाली असे आपण म्हणू शकतो. स्थानिक स्वशासनाला आपल्या स्थानिक जनतेच्या आवश्यकतांकडे कायमचा कानाडोळा करता येत नाही. स्थानिक जनतेच्या अडी अडचणींकडे तत्परतेने लक्ष पुरविले जाते. किंबहुना तसे लक्ष देणेच स्थानिक स्वशासन संस्थांचे कर्तव्यच ठरते. यातूनच जनतेची जागरुकता महत्त्वाची ठरते.

उपरोक्त घटकांचा निकष लावून स्थानिक शासन आणि स्थानिक स्वशासन असा भेद केला जातो. जनतेच्या एकूण कल्याणाचा विचार करता शासनाकडून चालविली जाणारी महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम सारखीच उपयुक्त आहे.

**निष्कर्ष**

१ गावात शांतता व एकोपा निर्माण होण्यासाठी स्थानिक शासना सोबत तंटामुक्त गाव मोहिमेच्या सदस्याद्वारे व अध्यक्षाद्वारे कार्य केले जातात.

२ महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम केवळ स्थानिक मोहीम चालविणारी संस्था नाही, तर ती लोकशाही शासन प्रणाली जीवंत ठेवण्याचा प्रमुख मार्ग आहे.

३ स्थानिक शासनाच्या मदतीने स्थानिक समस्यांसंबंधी गावातील वाद, शेती, पाणी, रस्ता संबंधी सर्वमान्य असा निर्णय घेतात व ती समस्या सोडवण्याची तंटामुक्त गाव मोहीम आपल्या अधिकार क्षेत्रात कार्यवाही देखील करतात.

४ तंटामुक्त गाव मोहीम आपल्या कामकाजाच्या सोयीनुसार स्थानिक पातळीवर नियम, उपनियम तयार करू शकतात. परंतु राज्य शासनाच्या अधिकार चौकटीत राहूनच निर्णय घ्यावे लागतात.

५ महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेमुळे नागरिक आणि तंटामुक्त समिती योग्य समन्वय साधता येतो. वादी-प्रतिवादींच्या संदर्भात विचारांचे आदान-प्रदान करणे शक्य होते.

६ महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम ही सामाजिक व आर्थिक आणि राजकीय विकासाचे आवश्यक लक्षण साध्य करणारी आहे आणि लोकांचा तंटामुक्त गाव मोहिमेत सहभाग वाढल्यावर सामाजिक समस्या सोडविण्यास मदत होते.

७ सामाजिक व्यवस्थेची गतिशीलता टिकून राहण्यासाठी महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचा सहभाग महत्त्वाचा मनला जातो.

## संदर्भ

१ महाराष्ट्र शासन निर्णय, २००८, क्र.तामुंगा १००८/ सी.आर./४३/२००८/पोल-१५.मंत्रालय, मुंबई.

२ शहापुरे सुरेश, २०२०, महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचा एक अभ्यास: विशेषता मराठवाडा, अजंठा प्रकाशन, औरंगाबाद.

३ हिवराळे भरत, २०१३, तंटामुक्त गावांची शांततेतून समृद्धीकडे वाटचाल, दिव्य मराठी, औरंगाबाद.

४ गागुर्डे किशोर, २०१०, गावागावात सार तंतामुक्तीच वार, लोकराज्य, मुंबई.

5 Chote A. U., 10 March, 2015, “A study of Tanta Mukti Gaon Mohim (Dispute-Free Rural Plan) of Maharashtra Administration”, Vol. 04, Issue-01.

6 Shinde Vasant, Bhopal, June, 2016. “The impact of Mahatma Gandhi Tanta mukti Gaon Abhiyan of Maharashtra State on Gram Panchayat Election in Sotara Taluka” Vol-02, Issue-6.

7 Kothari C.R., 2004, “Research Methodology: Methods & Techniques, New AGE International (P) Limited, 4835/24, Ansari Road, Daryaganj, New Delhi-110002.